Epaper

दैनिक
जन सम्राट टाईम्स

सत्याचे प्राईम्स

डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

'गद्दार ज्ञानेश' म्हणत आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल! (पान २ वर)



। बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६ । वर्ष १ । अंक १७७। पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

शेतकऱ्यांना कर्ज द्या, चाऱ्याची जिल्हानिहाय बॅलन्स शीट तयार करा'

गुलाबराव पाटलांचा शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर आक्रमक पवित्रा!

दुष्काळ निवारण उपसमितीच्या बैठकीत गुलाबराव पाटलांच्या महत्त्वपूर्ण सूचना

जन सम्राट टाईम्स

मुंबई | । राज्यातील दुष्काळसदृश परिस्थितीमुळे शेतकरी, पशुपालक आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेसमोर निर्माण झालेल्या संकटाच्या पार्श्वभूमीवर पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर ठोस भूमिका मांडली.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत त्यांनी बँकांनी शेतकऱ्यांना पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, प्रत्येक जिल्ह्याची चारा बॅलन्स शीट तयार करावी आणि दुष्काळाच्या परिस्थितीत शेतकरी व पशुधनासाठी तातडीने नियोजन करावे, अशी मागणी केली. त्यांच्या सूचनांमुळे बैठकीत पीककर्ज, चारा, पाणी आणि रब्बी हंगामाच्या नियोजनावर सविस्तर चर्चा झाली.सरकारकडून वारंवार निर्देश देऊनही यंदाच्या हंगामात बँकांकडून आतापर्यंत केवळ ८ टक्केच पीककर्जवाटप झाल्याचे बैठकीत स्पष्ट झाले. शेतकऱ्यांना कर्ज मिळण्यात होणाऱ्या विलंबाबाबत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. एकदा पीककर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांकडे पुन्हा-पुन्हा कागदपत्रांची मागणी करू नये, तसेच दुष्काळाच्या काळात बँका आणि खासगी



वित्तसंस्थांनी कर्जवसुलीसाठी शेतकऱ्यांना त्रास देऊ नये, असे निर्देश देण्यात आले. अशा तक्रारी आल्यास कारवाईचा इशाराही देण्यात आला. दुष्काळात जनावरांच्या चाऱ्याची संभाव्य टंचाई लक्षात घेऊन प्रत्येक जिल्ह्याची चारा बॅलन्स शीट तयार करावी, अशी महत्त्वपूर्ण सूचना गुलाबराव पाटील यांनी केली. कोणत्या जिल्ह्यात किती चारा उपलब्ध आहे, किती आवश्यकता आहे आणि भविष्यात किती चाऱ्याची गरज भासणार आहे, याचे अचूक नियोजन यामुळे करता येणार आहे. चारा छावण्यांऐवजी ग्रामपंचायतींच्या माध्यमातून चारा डेपो उभारण्याचा पर्यायही बैठकीत चर्चेला आला. त्याचवेळी वन विभागाच्या, पडीक तसेच जलसंपदा विभागाच्या तलावालगतच्या शासकीय जमिनींवर 'ग्रासलँड डेव्हलपमेंट' करून मोठ्या प्रमाणात चारा बँका उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. शेतकऱ्यांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा यासाठी कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी गावनिहाय पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ॲग्रीस्टॅक नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका घेण्यात आली. दरम्यान, एरंडोल आणि रावेर परिसरातील वाढत्या अवैध सावकारीवर नियंत्रण ठेवण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली.

रब्बीसाठी हरभरा-ज्वारीला प्राधान्य

खरीप हंगाम अडचणीत असला तरी ज्या भागात ओलावा किंवा पाण्याचा आधार उपलब्ध आहे, तेथे रब्बी हंगामात हरभरा आणि ज्वारी या पिकांना प्राधान्य देण्याचे नियोजन करण्यात आले. दुष्काळाच्या काळात शेतकरी आणि पशुधनाला दिलासा देण्यासाठी उपलब्ध संसाधनांचा योग्य वापर करण्यावर बैठकीत भर देण्यात आला कर्जमाफीतील वारसांच्या नोंदी आणि केवायसी गावनिहाय पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ॲग्रीस्टॅक नसलेल्या शेतकऱ्यांनाही मदतीपासून वंचित ठेवू नये, अशी भूमिका घेण्यात आली.

दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर नवीन उपाययोजनांचे नियोजन पुढील बैठकीत करण्याचेही ठरले. शहरी व ग्रामीण भागात १० टक्के पाणीकपात लागू करण्यासोबतच बांधकामांसाठी शुद्ध किंवा पिण्याचे पाणी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. बांधकामांसाठी प्रक्रिया केलेले एसटीपीचे पाणी वापरण्याची सूचना करण्यात आली. भूजल पुनर्भरणासाठी 'रिचार्ज शाफ्ट', बंद पडलेल्या पाणीपुरवठा योजना पुन्हा सुरू करणे, जुन्या विहिरी व तलावांमधील गाळ काढणे तसेच उपलब्ध जलस्रोतांचा प्रभावी वापर करण्यावरही बैठकीत भर देण्यात आला.

Selected

स्वतःला ठाण्याचा मसीहा समजणारे कुठे गेले?'

मुंबई: प्रदीप पूर्णेकर यांच्या कुटुंबीयांची शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते अंबादास दानवे यांनी भेट घेतली. यावेळी माजी खासदार राजन विचारेही उपस्थित होते. या भेटीनंतर पत्रकार परिषद घेत दानवेंनी राज्य सरकार आणि पोलिसांच्या तपासावर गंभीर प्रश्न उपस्थित केले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पूर्णेकर कुटुंबीयांसह भेट घेणार असल्याचेही त्यांनी सांगितले. या प्रकरणातील आरोपींचे कॉल डिटेल रेकॉर्ड (CDR) पूर्णपणे तपासण्याची मागणी दानवेंनी केली. एफआयआरमध्ये नाव असलेल्या सर्व संबंधितांचे सीडीआर तपासले पाहिजेत, असे ते म्हणाले. तपास यंत्रणा योग्य पद्धतीने काम करत नसल्याचा आरोप करत त्यांनी तपास अधिकाऱ्यांवर कुणाचा दबाव आहे, असा सवाल उपस्थित केला.यावेळी दानवेंनी एकनाथ शिंदे यांच्यावरही निशाणा साधला.

महाराष्ट्राला मिळणार मदत; उपमुख्यमंत्री शिंदे यांनी पंतप्रधान मोदींशी केली चर्चा

जन सम्राट टाईम्स

नवी दिल्ली। प्रतिनिधी: राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. सुमारे एक तास चाललेल्या या बैठकीत महाराष्ट्रातील पाणीटंचाई, शेतीचे नुकसान आणि पशुखाद्याच्या टंचाईबाबत सविस्तर चर्चा झाली. शिंदे यांनी पंतप्रधानांना राज्यातील 265 दुष्काळग्रस्त तालुक्यांची आणि धरणांमधील केवळ 74% शिल्लक पाणीसाठ्याची माहिती दिली. यावर केंद्राकडून महाराष्ट्राला सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन पंतप्रधानांनी दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. केंद्राचे पथक लवकरच दुष्काळी भागाची पाहणी करून विशेष पॅकेज जाहीर करण्याची शक्यता आहे.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यात दुष्काळाचे संकट गंभीर आहे आणि केंद्र सरकार दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्राला मोठी आर्थिक मदत देईल, असा विश्वास त्यांना आहे. ते म्हणाले की दुष्काळाच्या या कठीण काळात सरकार शेतकऱ्यांना एकटे सोडणार नाही आणि शेतकऱ्यांची दिवाळी काळी होऊ देणार नाही. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी पूर्ण ताकदीने उभे आहे. एकनाथ शिंदे म्हणाले की, बैठकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महाराष्ट्रातील दुष्काळाच्या परिस्थितीचे गांभीर्य जाणून घेतले. पंतप्रधानांनी राज्यातील पाण्याची स्थिती, शेती आणि जनावरांच्या चाऱ्याच्या उपलब्धतेबाबत माहिती घेतली. शिंदे यांनी सांगितले की, त्यांनी पंतप्रधानांना माहिती दिली की, राज्य सरकारचे मंत्रिमंडळ दुष्काळग्रस्त भागात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचले आणि त्यांना मानसिक आधार दिला. पंतप्रधानांनी विश्वास दिला की



दुष्काळाचे संकट मोठे आहे आणि केंद्र सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. ते पुढे म्हणाले की, केंद्राच्या पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना दरवर्षी 6,000 रुपये आणि राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत 6,000 रुपये दिले जातात, म्हणजेच शेतकऱ्यांना एकूण 12,000 रुपयांची वार्षिक मदत मिळते. गेल्या वर्षीही अतिवृष्टीने बाधित शेतकऱ्यांना सरकारने मदत दिली होती. उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले की, सरकारच्या तिजोरीवर पहिला हक्क बळीराजाचा आहे. शेतकरी संकटात आहे, तर सरकार मदत करण्यात कोणतीही कमतरता ठेवणार नाही. विरोधकांवर निशाणा साधत शिंदे म्हणाले की, विरोधकांकडे आता कोणतेही काम उरलेले नाही. फक्त मोर्चे काढणे, आंदोलने करणे आणि पंतप्रधान व गृहमंत्र्यांवर आरोप करणे हेच त्यांचे काम उरले आहे. यातच ते आपल्या राजकारणाची सार्थकता समजत आहेत. दरम्यान, महाराष्ट्र सरकारने 26 सप्टेंबर रोजी पावसाच्या कमतरतेमुळे राज्यातील 358 पैकी 265 तालुक्यांमध्ये म्हणजेच 74 टक्के भागात दुष्काळ जाहीर केला होता. केंद्राचे पथक लवकरच या भागाची पाहणी करणार आहे.राज्यातील गंभीर दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. सुमारे एक तास चाललेल्या या बैठकीत महाराष्ट्रातील पाणीटंचाई, शेतीचे नुकसान आणि पशुखाद्याच्या टंचाईबाबत सविस्तर चर्चा झाली. शिंदे यांनी पंतप्रधानांना राज्यातील 265 दुष्काळग्रस्त तालुक्यांची आणि धरणांमधील केवळ 74% शिल्लक पाणीसाठ्याची माहिती दिली. यावर केंद्राकडून महाराष्ट्राला सर्वतोपरी मदत केली जाईल, असे आश्वासन पंतप्रधानांनी दिल्याचे शिंदे यांनी सांगितले. केंद्राचे पथक लवकरच दुष्काळी भागाची पाहणी करून विशेष पॅकेज जाहीर करण्याची शक्यता आहे.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, राज्यात दुष्काळाचे संकट गंभीर आहे आणि केंद्र सरकार दुष्काळ निवारणासाठी महाराष्ट्राला मोठी आर्थिक मदत देईल, असा विश्वास त्यांना आहे.

महाराष्ट्राची लेक स्मृती मानधना टीम इंडियाची कर्णधार!

जन सम्राट टाईम्स

मुंबई। प्रतिनिधी: महाराष्ट्राच्या क्रीडा विश्वासाठी अभिमानाची आणि प्रत्येक मराठी माणसासाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. सांगलीची कन्या आणि भारतीय क्रिकेटमधील आघाडीची फलंदाज स्मृती मानधना हिची भारतीय महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (BCCI) ६ ऑक्टोबर रोजी तिच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केली. हरमनप्रीत कौरने सर्व फॉरमॅटमधील कर्णधारपदाचा राजीनामा दिल्यानंतर स्मृतीकडे नेतृत्वाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. स्मृती यापूर्वीही भारतीय संघाच्या नेतृत्वाची जबाबदारी सांभाळत आली आहे. हरमनप्रीतच्या अनुपस्थितीत तिने १८ टी-२० आणि ४ वनडे सामन्यांत भारताचे नेतृत्व केले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय नेतृत्वाचा अनुभव तिच्या गाठीशी आहे. याशिवाय महिला प्रीमियर लीगमध्ये रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचे नेतृत्व करताना तिने २०२४ आणि २०२६ मध्ये संघाला विजेतेपद मिळवून दिले आहे.

भारतीय महिला क्रिकेट संघाच्या नेतृत्वाची धुरा अनेक वर्षे सांभाळणाऱ्या हरमनप्रीत कौरने ६ ऑक्टोबर रोजी सर्व फॉरमॅटमधील कर्णधारपद सोडण्याची घोषणा केली. मात्र, खेळाडू म्हणून भारतीय संघाचे प्रतिनिधित्व सुरू ठेवणार



असल्याचे तिने स्पष्ट केले आहे. तिच्या नेतृत्वाखाली भारताने २०२५ मध्ये पहिल्यांदाच महिला एकदिवसीय विश्वचषक जिंकला. २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारताने सुवर्णपदक पटकावले. हरमनप्रीतच्या या निर्णयानंतर नव्या कर्णधाराच्या नावाबाबत उत्सुकता होती. अखेर BCCIने स्मृती मानधनाच्या नावावर शिक्कामोर्तब करत भारतीय महिला क्रिकेटच्या नेतृत्वात नव्या पर्वाची सुरुवात केली. 'भारताचे नेतृत्व करणे हा विशेष सन्मान' कर्णधारपदाची घोषणा झाल्यानंतर स्मृतीने या जबाबदारीबद्दल आनंद व्यक्त केला. भारताचे नेतृत्व करण्याची संधी मिळणे हा आपल्यासाठी विशेष सन्मान असून, देशासाठी खेळणे नेहमीच आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाचे राहिले आहे, असे तिने म्हटले. BCCI, निवड समिती, सहकारी खेळाडू आणि आतापर्यंत साथ देणाऱ्या सर्वांचे तिने आभार मानले. हरमनप्रीत कौरच्या योगदानाचाही स्मृतीने गौरव केला. भारतीय संघाचे नेतृत्व करताना हरमनप्रीतने दिलेल्या योगदानाबद्दल तिचे आभार मानत, नव्या भूमिकेची जबाबदारी पूर्णपणे जाणून संघासोबत काम करण्याची आणि भारतीय क्रिकेटला पुढे नेण्यासाठी सर्वोत्तम प्रयत्न करण्याची ग्वाही स्मृतीने दिली. झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेपासून नवे पर्व स्मृती मानधनाच्या नेतृत्वाखाली भारतीय महिला संघाची नवी सुरुवात झिम्बाब्वेविरुद्धच्या मालिकेपासून होणार आहे. भारत आणि झिम्बाब्वे यांच्यात १६ ऑक्टोबरपासून तीन टी-२० आणि त्यानंतर तीन वनडे सामने होणार आहेत.

आदिवासी विद्यार्थ्यांचा लढा पेटला!

मुंबई : आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनावरून राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा तापलं आहे. आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी नाकारून सरकारने आदिवासी विद्यार्थ्यांवर अन्याय केल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. लोकशाहीमध्ये आंदोलन करण्याचा अधिकार प्रत्येकाला असताना सरकार आणि पोलिसांकडून विद्यार्थ्यांची मुस्कटदाबी केली जात असल्याचा दावा काँग्रेसने केला. आदिवासी विद्यार्थ्यांनी आझाद मैदानात आंदोलन करण्याची परवानगी द्यावी किंवा राज्यपालांची भेट घडवून द्यावी, अशी मागणी केली होती.

कर्नाळा अभयारण्याजवळ पिस्तूल जप्त; टल्लीसाठी लूक आउट नोटीस!

जन सम्राट टाईम्स

ठाणे| प्रतिनिधी: शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पदाधिकारी प्रदीप पूर्णेकर यांच्या हत्या प्रकरणाला आठवड्यानंतर नवे वळण मिळाले आहे. मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा अभयारण्याजवळ एका पडक्या झोपडीच्या पाठीमागे झुडपात लपवून ठेवलेले एक पिस्तूल आणि एक मोबाइल पोलिसांनी जप्त केला आहे. अटकेत असलेल्या नितेश पवार उर्फ भावड्या याच्या चौकशीतून या शस्त्राचा आणि मोबाइलचा ठावठिकाणा पोलिसांना मिळाल्याची माहिती विशेष तपास पथकातील अधिकाऱ्यांनी दिली. दरम्यान, या हत्याकांडातील मुख्य फरार आरोपी संतोष कनोजिया उर्फ टल्ली याच्याविरुद्ध पोलिसांनी लूक आउट सर्क्युलर (LOC) जारी केले आहे. टल्लीसह आणखी एका फरार आरोपीचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके राज्याबाहेर रवाना करण्यात आली आहेत. झुडपात लपवले होते पिस्तूल आणि मोबाइल प्रदीप पूर्णेकर यांची २९ सप्टेंबर रोजी रात्री ठाण्यातील मानपाडा, गणेशनगर येथील कार्यालयात हत्या करण्यात आली होती. हल्लेखोरांनी गोळीबार करण्यासह धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा पोलिसांचा तपास आहे.

या प्रकरणात विशेष तपास पथकाने सुभाष शिंदे उर्फ पप्या, निखिल यादव उर्फ शूटर आणि नितेश पवार उर्फ भावड्या यांना अटक केली आहे. तिघेही सध्या पोलीस कोठडीत असून त्यांची कसून चौकशी सुरू आहे. नितेश पवारच्या चौकशीत कर्नाळा अभयारण्याजवळ पिस्तूल आणि मोबाइल लपवून ठेवल्याची माहिती समोर आली. त्यानंतर मंगळवारी पोलिसांचे पथक नितेशला घेऊन मुंबई-गोवा महामार्गालगतच्या संबंधित



ठिकाणी पोहोचले. एका पडक्या झोपडीच्या पाठीमागील झुडपांची झडती घेतल्यानंतर पोलिसांना पिस्तूल आणिमोबाइल मिळून आला. रात्री उशिरापर्यंत तपास सुरू पिस्तूल आणि मोबाइल जप्त केल्यानंतरही पोलिसांचे पथक बराच वेळ घटनास्थळी तपास करत होते.

जप्त करण्यात आलेल्या पिस्तूलाचा गुन्ह्यात वापर झाला आहे का, मोबाइल कोणाचा आहे आणि त्यातून तपासाला आणखी कोणते धागेदोरे मिळतात, याचा तपास सुरू आहे. सीसीटीव्ही आणि मोबाइल सीडीआरची तपासणी हत्येच्या दिवशी आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते का, याचा तपास करण्यासाठी पोलिसांनी अटक आणि फरार आरोपींच्या मोबाइल क्रमांकांचे सीडीआर आणि एसडीआर तपासले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, घटनेच्या दिवशी संबंधित आरोपी एकमेकांच्या संपर्कात असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले आहे. मालकांचीही चौकशी केली जात असून, त्यांचा या प्रकरणाशी काही संबंध आहे का, याचा तपास केला जात आहे. घटनास्थळापासून आरोपींच्या हालचालींचा माग काढण्यासाठी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची युद्धपातळीवर पडताळणी सुरू आहे. फरार आरोपींच्या शोधासाठी पथके रवाना पूर्णेकर हत्या प्रकरणातील अन्य दोन आरोपी अद्याप फरार आहेत. त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची पथके राज्याबाहेर रवाना करण्यात आली आहेत.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

मुख्यमंत्री फडणवीसांचा मोठा प्लॅन!

'पार्टिसिपेट मुंबई'मधून नागरिकांना मुंबईच्या विकासकामांशी थेट जोडणार

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: 'पार्टिसिपेट मुंबई' हा केवळ सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी उभारण्याचा मंच नसून शासन, महापालिका, कॉर्पोरेट आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन विकासासाठी काम करण्याचे व्यासपीठ आहे. समग्र संस्थेबरोबरच्या सामंजस्य करारामुळे महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होण्यास व कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. या दोन्ही उपक्रमांमुळे मुंबईच्या विकासाला लोकसहभाग आणि गतिमान प्रशासनाची जोड मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. (Participate Mumbai)

मुंबईच्या विकास प्रक्रियेत नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि तज्ज्ञांचा सहभाग वाढविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'पार्टिसिपेट मुंबई' हा भागीदारीचा नवा डिजिटल मंच सुरू केला आहे. त्याचे लोकार्पण तसेच महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी 'समग्र' या संस्थेसोबत सामंजस्य कराराचे आदानप्रदान बृहन्मुंबई महापालिकेच्या सभागृहात करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी



भिडे, यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, उद्योग व स्वयंसेवी क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'पार्टिसिपेट मुंबई' हा केवळ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधी उपलब्ध करून देणारा मंच नसून 'तुम्ही आणि आम्ही एकत्र येऊन समाजातील शेवटच्या घटकासाठी काय करू शकतो' यासाठीचा सहभागाचा मंच आहे. महापालिकेला ज्या क्षेत्रात भागीदारीची आवश्यकता आहे, अशा विविध प्रकल्पांची माहिती या मंचावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, रोजगार, पर्यावरण, उद्याने, सौंदर्यीकरण, गरिबी निर्मूलन यांसारख्या क्षेत्रांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या कंपन्या, स्वयंसेवी संस्था किंवा नागरिकांना त्यांच्या आवडीच्या प्रकल्पाची निवड करता येणार आहे.एखाद्या संस्थेला विशिष्ट क्षेत्रात काम करायचे असल्यास त्यांची स्वतःची योजना देखील या मंचावर मांडता येणार आहे.

त्यामुळे महापालिका आणि सामाजिक तसेच कॉर्पोरेट क्षेत्र यांच्यातील दरी कमी होऊन विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.कॉर्पोरेट सामाजिक उत्तरदायित्वासाठी (सीएसआर) किती निधी खर्च झाला, यापेक्षा त्यातून किती लोककल्याण झाले आणि कोणता परिणाम साधला, हे अधिक महत्त्वाचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. सीएसआरच्या माध्यमातून काम करणाऱ्या संस्थांकडून शासनाला नवीन तंत्रज्ञान, आधुनिक व्यवस्थापन पद्धती, प्रभावी निरीक्षण व्यवस्था आणि लवचिक कार्यपद्धती मिळते. शासनाच्या पारंपरिक प्रशासकीय प्रक्रियांमध्ये काही मर्यादा असतात. त्यामुळे सरकारी यंत्रणा आणि सीएसआर भागीदार यांची सांगड घातल्यास अधिक परिणामकारक काम होऊ शकते, असेही त्यांनी सांगितले. मुंबई महापालिकेने पायाभूत सुविधांच्या क्षेत्रात मोठे काम केले आहे. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य आणि पोषण या क्षेत्रांतही अधिक परिणामकारक हस्तक्षेप करण्याची गरज आहे. शहरातील काही भागांत कुपोषण, बालकांमधील खुंटलेली वाढ आणि कृशता या सारख्या समस्या अद्याप दिसून येतात. विशेषतः झोपडपट्ट्या आणि गरीब वस्त्यांमधील मुलांपर्यंत पोषण पोहोचविण्यासाठी सीएसआर भागीदारीचा प्रभावी वापर करण्याची गरज आहे

‘गद्दार ज्ञानेश’ म्हणत आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल!

पुण्यातील MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला आदित्य ठाकरेंची भेट; “भिमनवार फक्त प्यादे

जन सम्राट टाईम्स

पुणे। प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पुण्यात सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षार्थींच्या आंदोलनाला शिवसेना (ठाकरे गट) आमदार आदित्य ठाकरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि राज्य सरकारवर जोरदार टीका करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि MPSC अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. “आपण गद्दार ज्ञानेश कुमारांचा राजीनामा घेणारच आणि भिमनवारांचाही राजीनामा घेणार म्हणजे घेणारच,” असे आदित्य ठाकरे यांनी आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले. “भिमनवारांच्या मागे कोण?” विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांनी, “केंद्र सरकार कोण चालवत आहे? भिमनवार यांच्या मागे कोण आहे?” असे प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सरकारचे नाव घेतल्यानंतर ठाकरे यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि महाराष्ट्रात MPSC अध्यक्ष विवेक भिमनवार हे दोघेही महत्त्वाच्या पदांवर आहेत. त्यांच्या मागे सरकारचा पाठिंबा असल्याचा आरोप करत, दोघांनीही राजीनामा द्यावा, अशी भूमिका आदित्य ठाकरे यांनी मांडली. “भिमनवार फक्त प्यादे” विद्यार्थ्यांना संबोधित करताना ठाकरे यांनी, “तुमचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात गेला आहे. आपली एकच मागणी आहे—राजीनामा,” असे म्हटले. त्यानंतर विद्यार्थ्यांना कोणाचा राजीनामा हवा आहे, असा सवाल त्यांनी केला असता, उपस्थित



विद्यार्थ्यांनी विवेक भिमनवार यांचे नाव घेतले. यावेळी आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना उद्देशून, “हे फडणवीस साहेब ऐकून घ्या,” असे म्हणत भिमनवार हे केवळ ‘प्यादे’ असल्याचे मत व्यक्त केले. खरा मुद्दा हा MPSCपुरता मर्यादित नसून देशभरात मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही होत असल्याचे त्यांनी सांगितले. MPSC आंदोलनाला राजकीय नेत्यांची वाढती उपस्थिती पुण्यातील MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला गेल्या काही दिवसांत विविध राजकीय नेत्यांनी भेटी दिल्या आहेत. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाला संजय राऊत, राज ठाकरे यांच्यानंतर आदित्य ठाकरे यांनीही भेट दिली. विद्यार्थ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये MPSC अध्यक्षांच्या राजीनाम्यासह परीक्षा प्रक्रियेत पारदर्शकता आणि पेपरफुटीच्या प्रकरणांची चौकशी यांचा समावेश आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी MPSC अध्यक्षांना हटवण्याचा अधिकार राज्य सरकारला थेट नसल्याचे स्पष्ट केले आहे. अध्यक्षांना हटविण्याची घटनात्मक प्रक्रिया वेगळी असल्याचे त्यांनी सांगितले असून, अध्यक्ष व माजी अध्यक्षांच्या चौकशीची भूमिका सरकारने मांडली आहे. “सरकार दडपशाहीची भूमिका राबवत आहे” देशातील सध्याच्या राजकीय परिस्थितीचा संदर्भ देत आदित्य ठाकरे यांनी केंद्र सरकारवरही टीका केली. राहुल गांधी, प्रियंका गांधी आणि अन्य खासदारांना अटक झाल्याचा उल्लेख करत सरकार दडपशाहीची भूमिका राबवत असल्याचा आरोप त्यांनी केला. पुण्यातील MPSC आंदोलनामुळे परीक्षा प्रक्रियेतील पारदर्शकता, पेपरफुटी आणि आयोगाच्या कार्यपद्धतीचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला असून, आता सरकारकडून या मागण्यांवर पुढील कोणती भूमिका घेतली जाते, याकडे विद्यार्थ्यांसह राज्याचे लक्ष लागले आहे.महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पुण्यात सुरू असलेल्या स्पर्धा परीक्षार्थींच्या आंदोलनाला शिवसेना (ठाकरे गट) आमदार आदित्य ठाकरे यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी केंद्र सरकार, निवडणूक आयोग आणि राज्य सरकारवर जोरदार टीका करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि MPSC अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी केली. “आपण गद्दार ज्ञानेश कुमारांचा राजीनामा घेणारच आणि भिमनवारांचाही राजीनामा घेणार म्हणजे घेणारच,” असे आदित्य ठाकरे यांनी आंदोलनस्थळी विद्यार्थ्यांना संबोधित करताना म्हटले. “भिमनवारांच्या मागे कोण?” विद्यार्थ्यांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे यांनी, “केंद्र सरकार कोण चालवत आहे? भिमनवार यांच्या मागे कोण आहे?” असे प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी सरकारचे नाव घेतल्यानंतर ठाकरे यांनी दोन्ही पदाधिकाऱ्यांच्या राजीनाम्याच्या मागणीचा पुनरुच्चार केला. दिल्लीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि महाराष्ट्रात MPSC अध्यक्ष विवेक भिमनवार हे दोघेही महत्त्वाच्या पदांवर आहेत. त्यांच्या मागे सरकारचा पाठिंबा असल्याचा आरोप करत, दोघांनीही राजीनामा द्यावा, अशी भूमिका आदित्य ठाकरे यांनी मांडली. “भिमनवार फक्त प्यादे” विद्यार्थ्यांना संबोधित करताना ठाकरे यांनी, “तुमचा आवाज संपूर्ण महाराष्ट्रात गेला आहे. आपली एकच मागणी आहे—राजीनामा,” असे म्हटले. त्यानंतर विद्यार्थ्यांना कोणाचा राजीनामा हवा आहे, असा सवाल त्यांनी केला असता, उपस्थित विद्यार्थ्यांनी विवेक भिमनवार यांचे नाव घेतले.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

आंदोलनाला हायकोर्टाचा दणका? नागरिकाची याचिका



जन सम्राट टाईम्स

पुणे | प्रतिनिधी : पुण्यात सुरू असलेल्या MPSC आंदोलनाला (Pune MPSC Student Protest) आता न्यायालयीन वळण मिळालं आहे. आंदोलनाविरोधात एका पुणेकर नागरिकाने थेट मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार, पोलिस आणि आंदोलनाच्या आयोजकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी बुधवारी सकाळी 10.30 वाजता होणार आहे पुण्यात सुरू असलेल्या आंदोलनामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीवर आक्षेप घेत याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. पुण्यातील आंदोलकांनी तात्काळ आंदोलनाची जागा सोडावी, सरकारने आंदोलनासाठी निश्चित जागा उपलब्ध करून द्यावी आणि आंदोलनाच्या आयोजकांवर गुन्हा दाखल करावा, अशा मागण्या याचिकेत करण्यात आल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकारसोबतच पुणे पोलिसांनाही नोटीस बजावली आहे. पोलिस आयुक्त अमितेश कुमार आणि पोलिस उपआयुक्तांसह आंदोलनाचे प्रमुख आयोजक प्रमोद पाटील, नितीन आंधळे आणि चेतन वाघज यांनाही नोटीस देण्यात आली आहे. या प्रकरणावर बुधवारी सकाळी 10.30 वाजता मुंबई उच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. त्यामुळे आता सरकार आणि पोलिसांकडून न्यायालयात काय भूमिका मांडली जाते, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

दरम्यान, आंदोलनं सरकारी पातळीवर हाताळणं शक्य न झाल्यास न्यायालयीन आदेशाचा मार्ग स्वीकारला जात असल्याचं चित्र अलीकडच्या काही आंदोलनांमध्ये पाहायला मिळालं आहे. मुंबईतील मराठा आंदोलनासह विविध आंदोलनांमध्येही न्यायालयीन हस्तक्षेपाचा मुद्दा समोर आला होता. झालेल्या याचिकेमुळे या आंदोलनाबाबतही न्यायालय काय भूमिका घेतं, हे बुधवारी स्पष्ट होणार आहे. त्यामुळे MPSC आंदोलन सुरू राहणार की त्यासाठी पर्यायी जागा निश्चित होणार, याकडे आंदोलक आणि पुणेकरांचं लक्ष लागलं आहे.पुण्यात सुरू असलेल्या MPSC आंदोलनाला (Pune MPSC Student Protest) आता न्यायालयीन वळण मिळालं आहे. या याचिकेवर सुनावणी करताना मुंबई उच्च न्यायालयाने राज्य सरकार, पोलिस आणि आंदोलनाच्या आयोजकांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे.

राज्यातील काही भागांत विजांच्या कडकडाटासह पावसाची शक्यता

हवामान विभागाकडून अलर्ट जारी

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी: गेल्या काही दिवसांपासून वातावरणात कमालीचा बदल जाणवत आहे. राज्यातील अनेक भागांत ‘ऑक्टोबर हीट’चा तडाखा बसत आहे. त्यामुळे उकाड्याने नागरिक हैराण झाले आहेत. त्यातच मान्सून आता परतीच्या प्रवासाला लागला आहे. असे असताना कोकणसह राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये आज विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता असून, हवामान विभागाकडून ‘यलो अलर्ट’ देण्यात आला आहे. कोकणात पावसाचा अंदाज असून, विदर्भातील गडचिरोली जिल्ह्यात हवामान काहीसे अस्थिर राहण्याची शक्यता आहे. गडचिरोलीमध्ये विजांच्या कडकडाटासह वादळी पाऊस होण्याचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्याला येलो अलर्ट देण्यात आला आहे. विशेषतः दुपारनंतर किंवा संध्याकाळच्या सुमारास अचानक



वातावरण बदलण्याची शक्यता आहे. राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाने काहीशी विश्रांती घेतली असून, दुसरीकडे उन्हाचा चटका आणि उकाडा वाढू लागला आहे. सध्या राज्यात याच ‘ऑक्टोबर हीट’चा प्रभाव जाणवू लागला आहे. अशातच दिलासादायक बाब म्हणजे काही जिल्ह्यांमध्ये आज विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे.दरम्यान, ऊनाचा कडाका तर पावसाची शक्यता त्यामुळे आता पुढील काही दिवसांतही हवामानात चढ-उतार कायम राहण्याची शक्यता आहे. नागरिकांनी स्थानिक हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे.

कोकणातील सिंधुदुर्ग आणि पश्चिम महाराष्ट्रातील कोल्हापूर या जिल्ह्यांमध्येही विजांसह पावसाची शक्यता आहे. काही ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण होऊन हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळू शकतात. राज्यातील उर्वरित भागात मात्र आकाश निरभ्र राहण्याची शक्यता आहे. सध्या पावसाचे प्रमाण कमी झाल्यामुळे दिवसाच्या तापमानात वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. आता उन्हाचा चटका अधिक जाणवू शकतो. त्यासोबतच वातावरणातील उकाडाही वाढण्याची शक्यता आहे. ऑक्टोबर महिन्याच्या सुरुवातीलाच पुणे शहरात उष्णतेचा चटका तीव्रतेने जाणवू लागला आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरातील कमाल आणि किमान तापमानात सातत्याने वाढ होत असून, पुणेकरांना आता ‘ऑक्टोबर हिट’चा थेट सामना करावा लागत आहे.

सोलापुरात मोठा उद्योग आणणार; उदय सामंत यांचे आश्वासन

एमआयडीसीत मोठा उद्योग आणण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

सोलापूर । प्रतिनिधी: : मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळणे हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासातील महत्त्वाचा टप्पा असून, अभिजात मराठी हीच आपली खरी ओळख असल्याचे प्रतिपादन उद्योग व मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठात आयोजित ‘अभिजात मराठी भाषा सप्ताह’ कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी त्यांनी सोलापूरच्या औद्योगिक विकासासह विद्यार्थ्यांच्या रोजगाराचा मुद्दाही उपस्थित केला. एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग आणून पुणे, मुंबई आणि बंगळुरूकडे होणारे तरुणांचे स्थलांतर थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सोलापूरच्या औद्योगिक विकासाला गती देण्यासाठी एमआयडीसीमध्ये मोठा उद्योग आणणे गरजेचे असल्याचे सामंत यांनी सांगितले. आचारसंहिता संपल्यानंतर विद्यार्थ्यांशी चर्चा करून याबाबत ठोस पुढाकार घेण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.स्थानिक



पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण झाल्यास तरुणांचे मोठ्या शहरांकडे होणारे स्थलांतर कमी होण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. सोलापूरच्या औद्योगिक विकासासाठी शासनाकडून आवश्यक प्रयत्न केले जातील, असेही त्यांनी सांगितले.खासदार ज्योती वाघमारे यांनीही सोलापूरच्या औद्योगिक मागणीचा मुद्दा जोरदारपणे मांडला. रोजगाराच्या संधींच्या अभावामुळे तरुण पुणे, मुंबई आणि अन्य मोठ्या शहरांकडे स्थलांतरित होत आहेत. परिणामी सोलापूर ‘वृद्धांचे शहर’ बनत चालल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. एमआयडीसीमध्ये तातडीने मोठा उद्योग सुरू करण्यासाठी उद्योगमंत्र्यांनी विशेष पुढाकार घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली. स्थानिक तरुणांना रोजगार मिळाल्यास शहराच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यापीठातील विविध उपक्रमांची माहिती दिली. विद्यापीठात सध्या १४६ कौशल्य विकास अभ्यासक्रम सुरू असून, सुमारे ३५ हजार विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने जोडले गेल्याचे त्यांनी सांगितले. या अभ्यासक्रमांच्या विस्तारासाठी ‘स्कूल ऑफ स्किल डेव्हलपमेंट’ इमारतीचा प्रस्ताव मंजूर करण्याची मागणी त्यांनी सामंत यांच्याकडे केली. मराठी विभागातील संशोधनासाठी प्राध्यापक पदांना मंजुरी मिळावी, अशी मागणीही त्यांनी केली.

निवडणुकीत: आमदार सुरेश खाडेंसह सात अर्ज अवैध

जन सम्राट टाईम्स

पाळधी । प्रतिनिधी: सांगली जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीतील उमेदवारी अर्जांच्या छाननीत भाजपचे आमदार सुरेश खाडे आणि खासदार विशाल पाटील यांच्या पत्नी पूजा पाटील यांच्यासह सात उमेदवारांचे अर्ज अवैध ठरले. दुसरीकडे खासदार विशाल पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सत्यजित देशमुख आणि अनिता सगरे यांच्या



अर्जांवरील हरकती फेटाळून त्यांचे अर्ज वैध ठरविण्यात आले. त्यामुळे प्रमुख नेत्यांच्या उमेदवारीबाबतची उत्कंठा संपली असून, आता निवडणुकीतील पुढील राजकीय हालचालींना वेग येणार आहे.

जिल्हा बँकेच्या २१ जागांसाठी तब्बल ३५१ अर्ज दाखल झाले होते. छाननीनंतर सात अर्ज अवैध ठरले असून, तुमच्या दिलेल्या माहितीनुसार २९५ अर्ज वैध राहिले आहेत. आता माघारीच्या प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.आमदार सुरेश खाडे यांनी सोसायटी गटाबरोबरच अनुसूचित जाती गटातूनही उमेदवारी अर्ज दाखल केला होता.जोडलेल्या कागदपत्रांवर हरकत घेण्यात आली होती. छाननी आणि सुनावणीनंतर खाडे यांचे दोन्ही अर्ज अवैध ठरल्याने ते निवडणूक रिंगणातून बाहेर पडले आहेत. या निर्णयाविरोधात खाडे पुढील कायदेशीर भूमिका घेणार का, याकडे आता लक्ष लागले आहे. पूजा पाटील यांचा एक अर्ज बाद; उमेदवारी कायम खासदार विशाल पाटील यांच्या पत्नी पूजा पाटील यांच्या मिरज सोसायटी गटातील अर्जावर सभासदत्वाचा कालावधी आणि कागदपत्रांबाबत हरकत घेण्यात आली होती. हा अर्ज अवैध ठरला.

स्थगितीचा कालावधी मराठी शिकण्यासाठी वापरा

जन सम्राट टाईम्स

मुंबई । प्रतिनिधी: महाराष्ट्रात व्यवसाय करताना येथील नागरिकांशी दैनंदिन व्यवहार करण्यासाठी मराठी भाषेत संवाद साधता येणे महत्त्वाचे आहे. रिक्षा, टॅक्सी तसेच ॲपआधारित प्रवासी वाहने चालविणाऱ्या अमराठी चालकांनी मराठी भाषा शिकण्यासाठी पुढाकार घ्यावा आणि ‘हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे मराठी संवाद भाषा अभियानात’ सहभागी व्हावे, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक (Pratap Sarnaik) यांनी केले आहे. ‘अभियानाच्या पुढील टप्प्याच्या नियोजनासंदर्भात परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील त्यांच्या दालनात बैठक झाली. या बैठकीस परिवहन विभागाचे आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त रवी गायकवाड, कोकण मराठी साहित्य परिषदेचे प्रदीप ढवण, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले, मराठी विश्वकोश मंडळाचे डॉ. शामाकांत देवरे तसेच राज्यातील सर्व प्रादेशिक परिवहन अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.महाराष्ट्रात राहून व्यवसाय करणाऱ्या प्रत्येक प्रवासी वाहनचालकाला प्रवाशांशी सहज आणि आत्मविश्वासाने संवाद साधता यावा, या उद्देशाने परिवहन विभाग, मराठी भाषा विभाग आणि कोकण मराठी साहित्य परिषद



यांच्या संयुक्त विद्यमाने हे अभियान राबविण्यात येत आहे.

अभियानाच्या पहिल्या टप्प्यात राज्यभरात १८० हून अधिक ठिकाणी प्रशिक्षण केंद्रे सुरू करून, सुमारे १,८०० शिक्षकांच्या माध्यमातून १ लाख ६५ हजार ८०० हून अधिक अमराठी चालकांना व्यावहारिक मराठीचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. परिवहन मंत्री सरनाईक म्हणाले की, मुंबई महानगर प्रदेशात (एमएमआर) रिक्षाचालकांची संख्या ४ लाख ४० हजार २३८, तर टॅक्सीचालकांची संख्या ४३ हजार १०६ इतकी आहे. या सर्व चालकांनी मराठी भाषा प्रशिक्षणाचा लाभ घेऊन प्रशिक्षण पूर्ण करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.प्रशिक्षण केंद्रांबरोबरच ऑनलाइन माध्यमातूनही व्यावहारिक मराठी शिकण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे मंत्री सरनाईक<< यांनी सांगितले. दरम्यान, व्यावहारिक मराठीसंदर्भातील सुधारित नियमांच्या अंमलबजावणीला १८ ऑगस्ट २०२७ पर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. मात्र, ही स्थगिती म्हणजे नियम रद्द झाले आहेत, असा त्याचा अर्थ नाही. त्यामुळे या कालावधीचा

MPSC आंदोलनावरून महापौरांचे रोहित पवारांना खुले आव्हान!

“विद्यार्थ्यांना आंदोलनाचा अधिकार, आंदोलनाच्या राजकीय सहभागावरही उपस्थित केली शंका

जन सम्राट टाईम्स

पुणे । प्रतिनिधी : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) अध्यक्ष विवेक भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थी आंदोलनाला आता राजकीय संघर्षाचे स्वरूप येताना दिसत आहे. आमदार रोहित पवार यांनी सरकारने मागण्या मान्य न केल्यास पुणे बंदचा इशारा दिल्यानंतर पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांनी त्यांना थेट आव्हान दिले आहे. “पुणे बंद पाडून दाखवा, मग पुणेकर काय आहेत हे कळेल,” अशी भूमिका नागपुरे यांनी मांडली. MPSC विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला विविध राजकीय नेत्यांनी पाठिंबा दिल्यानंतर आंदोलनाचा मुद्दा अधिक तापला आहे. रोहित पवार यांच्या आंदोलनाला विविध विरोधी पक्षांच्या नेत्यांनी भेट दिली आहे. दरम्यान, पवार यांनी भिमनवार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर सरकारला ४८ तासांची मुदत दिल्याचे वृत्त आहे. “पुणे हे विद्येचे माहेर; विद्यार्थ्यांनी शहराला त्रास देऊ नये” महापौर मंजुषा नागपुरे यांनी पुणे शहर आणि विद्यार्थ्यांचे असलेले नाते अधोरेखित केले. देशभरातून लाखो विद्यार्थी शिक्षण आणि स्पर्धा



परीक्षांच्या तयारीसाठी पुण्यात येतात. पुणे शहराने विद्यार्थ्यांना कायम सहकार्य केले असून, विद्यार्थ्यांनीही शहराच्या दैनंदिन जीवनाला त्रास होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे, असे त्यांनी सांगितले. “विद्यार्थ्यांना त्यांच्या मागण्या मांडण्याचा आणि आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. मात्र, पुणे शहर बंद पाडून सामान्य नागरिकांना वेठीस धरणे योग्य नाही,” अशी भूमिका नागपुरे यांनी स्पष्ट केली. “कॉलेजला जाणारे विद्यार्थी, रुग्णांचे काय?” पुणे बंद झाल्यास त्याचा परिणाम सामान्य नागरिकांवर होईल, असा मुद्दा महापौरांनी उपस्थित केला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये पोहोचता येणार नाही, रुग्णांना रुग्णालयात पोहोचण्यास अडचणी येऊ शकतात आणि शहरातील दैनंदिन व्यवहार विस्कळीत होऊ शकतात, असे त्यांनी नमूद केले. “विद्यार्थी येथे शिक्षण घेण्यासाठी आले आहेत. त्यांनी आपल्या करिअरवर लक्ष केंद्रित करावे. राजकीय पक्षांच्या राजकीय भूमिकांमध्ये ओढले जाऊ नये,” असे आवाहनही त्यांनी केले. “हे आंदोलन करणारे खरोखर विद्यार्थी आहेत का?” महापौरांनी आंदोलनाच्या स्वरूपाबाबतही प्रश्न उपस्थित केला. सध्या सुरू असलेल्या आंदोलनात राजकीय नेत्यांचा वाढता सहभाग पाहता, आंदोलनामध्ये केवळ विद्यार्थीच सहभागी आहेत का, अशी शंका वाटत असल्याचे त्यांनी म्हटले. शरद पवार आणि सुप्रिया सुळे पुण्यात राहतात. पुणे शहर बंद करण्याच्या भूमिकेशी ते सहमत आहेत का, असा सवालही नागपुरे यांनी उपस्थित केला.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव अन् गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात!

खान्देश दशनाम गोसावी समाजाचा सोहळा उत्साहात; अनाथ व निराधार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत

जन सम्राट टाईम्स

धुळे-जळगाव-नंदुरबार। प्रतिनिधी: खान्देश दशनाम गोसावी समाज संस्था, धुळे-जळगाव-नंदुरबार यांच्या वतीने आयोजित 'विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६' महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध शिवचरित्र व्याख्यानकार व 'अनाथांचे नाथ' म्हणून परिचित असलेले माननीय यशवंतजी गोसावी सर यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि भावनिक वातावरणात संपन्न झाला. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेची सुविधा आणि गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत अशा विविध उपक्रमांमुळे हा सोहळा संस्मरणीय ठरला. कार्यक्रमाचे उद्घाटन भारती प्रॉपर्टीजचे संचालक माननीय धर्मवीरजी भारती यांच्या हस्ते झाले. संस्थेच्या तिसऱ्या मजल्याच्या बांधकामासाठी त्यांनी दोन लाख रुपयांची भरीव मदत देण्याचे जाहीर केले. या सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने धर्मवीरजी भारती यांचे आभार मानण्यात आले. माथाडी कामगार संघटनेचे महाराष्ट्र राज्य सचिव तथा भटके-विमुक्त हक्क परिषदेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष माननीय प्रतीक भाऊ गोसावी यांनीही कार्यक्रमास विशेष उपस्थिती लावून विद्यार्थ्यांना व समाजबांधवांना मार्गदर्शन केले.



विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिकेचे उद्घाटन विद्यार्थ्यांना शांत, शिस्तबद्ध आणि अभ्यासासाठी पोषक वातावरण उपलब्ध व्हावे या उद्देशाने उभारण्यात आलेल्या *अभ्यासिका (स्टडी रूम)*चे उद्घाटन नंदुरबार जिल्हा दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष अमोल प्रल्हाद भारती, सुरत दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष उत्तमपुरी कैलासपुरी गोसावी, राजेंद्र नारायण भारती तसेच परभणी दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष स्वप्निल भैय्या भारती यांच्या हस्ते करण्यात आले.ही अभ्यासिका समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीसाठी उपयुक्त ठरणार असून, विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी चांगले वातावरण मिळावे या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम राबविण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रमात शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत शिक्षणाच्या माध्यमातून समाजाच्या प्रगतीत योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले. अनाथ व निराधार विद्यार्थ्यांना मदतीचा हात कार्यक्रमातील सर्वाधिक भावनिक क्षण अनाथ व निराधार विद्यार्थ्यांना आर्थिक मदत देताना पाहायला मिळाला. खान्देश दशनाम गोसावी समाज संस्थेचे अध्यक्ष साहेबराव काळूगिरी गोसावी उर्फ भाऊसाहेब व त्यांच्या कुटुंबीयांच्या वतीने समाजातील अनाथ व निराधार विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक खर्चासाठी प्रत्येकी ५ हजार रुपयांची मदत करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांविषयी मनोगत व्यक्त करताना भाऊसाहेब गोसावी भावूक झाले. त्यांच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याने उपस्थितांचेही मन हेलावले. त्यांनी 'अनाथांचे नाथ' यशवंतजी गोसावी सरांना या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्यासाठी मदतीचे आवाहन केले.

या आवाहनाला प्रतिसाद देत यशवंतजी गोसावी सरांनी जामनेर तालुक्यातील एका विद्यार्थ्याच्या शैक्षणिक मदतीसाठी ११ हजार रुपयांचा धनादेश दिला. हा प्रसंग समाजातील माणुसकी, संवेदनशीलता आणि गरजू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सामूहिकपणे उभे राहण्याचा संदेश देणारा ठरला. देणगीदारांचे मोलाचे योगदान विद्यार्थी गुणगौरव सोहळ्यासाठी समाजातील अनेक दानशूर व्यक्तींनी आर्थिक तसेच शैक्षणिक साहित्याच्या स्वरूपात सहकार्य केले. खान्देश संचालक सुरेंद्र गोसावी यांनी विद्यार्थ्यांसाठी स्कूल बॅग खरेदीसाठी २० हजार रुपये खर्च केले. जळगाव जिल्हा दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष चंद्रभान भगवान गिरी गोसावी यांनी ११ हजार रुपयांची मदत केली. सुरत दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष चंद्रभान गोसावी उर्फ आबासाहेब यांनी विद्यार्थ्यांना प्रत्येकी पाच नोटबुक दिल्या. तसेच रवि भरत गोसावी, सटाणा आणि भास्कर गोसावी, सटाणा यांनी दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांना सायकली देऊन सहकार्य केले. कार्यक्रमातील भोजन व्यवस्थेसाठी रवींद्र शिव गिरी यांनी सहकार्य केले. इतर सर्व देणगीदारांनी केलेल्या आर्थिक व वस्तुरूप सहकार्याबद्दल संस्थेच्या वतीने जाहीर आभार व्यक्त करण्यात आले. विविध भागांतील समाजबांधवांची उपस्थिती कार्यक्रमास सुरत, लातूर, परभणी, बागलाण, शिरपूर तालुका आणि अमळनेर तालुका दशनाम गोसावी समाजाच्या टीमसह महाराष्ट्राच्या विविध भागांतून समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. घोटाने, नंदुरबार, वडाळी, मेथी, साळवे, डाखुरे, शिंदखेडा, अमळनेर, नगाव, पाचोरा, लोहार, सटाणा, जळगाव यांसह असंख्य गावांतील समाजबांधव, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कार्यक्रमास उपस्थिती लावली. मान्यवरांचे मार्गदर्शन कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दशनाम गोसावी समाज उन्नती मंडळ, लातूरचे अध्यक्ष प्रवीण गिरी सर, खान्देश दशनाम गोसावी समाज संस्थेचे उपाध्यक्ष आण्णासाहेब किरण भारती तसेच संस्थेचे सचिव अशोक बारकू गिरी सर यांनी केले.यावेळी धर्मवीरजी भारती, प्रतीक भाऊ गोसावी, यशवंतजी गोसावी सर, परभणी दशनाम गोसावी समाजाचे अध्यक्ष स्वप्निल भैय्या भारती सर तसेच डॉ. उदय मनोज गोसावी यांनी मनोगत व्यक्त करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. आयोजनासाठी पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे योगदान सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष भाऊसाहेब साहेबराव गोसावी, उपाध्यक्ष आण्णासाहेब किरण भारती, खजिनदार नानासाहेब शरदभाऊ गोसावी, संचालक आबासाहेब विजय गोसावी, संचालक मनोज गोसावी, सचिव अशोक गिरी सर, सहसचिव नवनीत गोसावी तसेच सामाजिक कार्यकर्ते योगेशपुरी गोसावी यांच्यासह संपूर्ण खान्देश दशनाम गोसावी समाज टीमने अथक परिश्रम घेतले. गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव, गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, अभ्यासिकेची निर्मिती आणि समाजातील एकजुटीचा संदेश या चारही बाबींचा सुंदर संगम घडविणारा 'विद्यार्थी गुणगौरव सोहळा २०२६' समाजाच्या शैक्षणिक वाटचालीला नवी दिशा देणारा आणि संस्मरणीय ठरला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

चौकशी समितीचा अहवाल पाच महिने रखडला!



जन सम्राट टाईम्स

सोयगाव । प्रतिनिधी : मौजे माळेगाव पिंपरी येथील ग्रामपंचायत कारभाराबाबत करण्यात आलेल्या तक्रारीच्या चौकशीसाठी पंचायत समिती सोयगावने त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली. मात्र, समितीला सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे स्पष्ट निर्देश असतानाही तब्बल पाच महिने उलटून गेले तरी अहवाल सादर झाल्याची माहिती उपलब्ध नसल्याचा दावा तक्रारदार शिवराम दगडू जाधव यांनी केला आहे. याप्रकरणी त्यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत अर्ज दाखल करून चौकशीची सद्यस्थिती आणि अहवालाबाबत माहिती मागितली आहे. ६ मार्चच्या तक्रारीनंतर १२ मे रोजी समिती गठीत शिवराम दगडू जाधव, रा. माळेगाव पिंपरी यांनी ६ मार्च २०२६ रोजी ग्रामपंचायतीच्या कारभाराबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती सोयगाव यांच्याकडे तक्रार केली होती. या तक्रारीची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी जा.क्र. पंससो/प२/कावि/२०२६, दि. १२ मे २०२६ अन्वये ए. एन. दौड, मोहन गिरी आणि अक्षय जाधव यांची त्रिसदस्यीय चौकशी समिती गठीत केली. समितीने सात दिवसांत चौकशी करून अहवाल सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. मात्र, आदेशानंतर सुमारे पाच महिने उलटूनही चौकशी आणि अहवालाबाबत स्पष्ट माहिती मिळाली नसल्याने त्यांनी आता माहिती अधिकाराचा आधार घेतला आहे. RTIमधून चार महत्त्वाचे सवाल तक्रारदाराने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) अन्वये पंचायत समितीकडे अर्ज दाखल केला आहे. या अर्जातून त्यांनी पुढील माहिती मागितली आहे— १. चौकशी समितीने माळेगाव पिंपरी येथे प्रत्यक्ष चौकशी केली आहे का? केली असल्यास पंचनामा व चौकशी अहवालाची प्रत द्यावी. २. आदेशानुसार सात दिवसांच्या मुदतीत चौकशी अहवाल सादर करण्यात आला आहे का? अहवाल सादर केला नसल्यास विलंबाचे कारण काय? ३. चौकशी अहवालाच्या आधारे संबंधित ग्रामसेवक अथवा अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली? असल्यास संबंधित आदेशाची प्रत द्यावी. ४. ६ मार्च २०२६ रोजी दाखल केलेल्या मूळ तक्रारीची संपूर्ण फाईल नोटिंग उपलब्ध करून द्यावी. मिळते की दडपली जाते?'; ग्रामस्थांचे लक्ष RTIच्या उत्तराकडे चौकशी समिती गठीत करून सात दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले असतील.

नरडाणा एमआयडीसीत ८० हजारांहून अधिक पाण्याच्या बाटल्यांचा साठा जप्त!

सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' मोहिमेत कारवाई

जन सम्राट टाईम्स

धुळे, । प्रतिनिधी : 'सुरक्षित अन्न, सुरक्षित महाराष्ट्र' मोहिमेअंतर्गत अन्न व औषध प्रशासनाच्या धुळे पथकाने नरडाणा एमआयडीसीतील पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर उत्पादन करणाऱ्या आस्थापनावर कारवाई केली. तपासणीदरम्यान तीन प्रकारच्या पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरचे नमुने विश्लेषणासाठी घेण्यात आले असून, संशयित साठ्यातील ८० हजार २०८ पेट बाटल्या, अंदाजे ८ लाख १ हजार ६३२ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. मा. अन्न सुरक्षा आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या आदेशानुसार ही मोहीम राबविण्यात येत आहे. त्याअंतर्गत धुळे जिल्ह्यातील शिवाय बिव्हरेजेस एलएलपी, प्लॉट क्र. टी-११, नरडाणा इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, नरडाणा, ता. शिंदखेडा, जि. धुळे या आस्थापनाची अन्न व औषध प्रशासनाच्या पथकाने तपासणी केली. तीन प्रकारच्या पाण्याचे नमुने घेतले तपासणीदरम्यान 'बरेली' पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर, 'ग्रीष्मा एक्वा' पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर आणि 'एक्वा अजंता'



पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटर या तीन अन्न पदार्थांचे नमुने घेण्यात आले. हे नमुने पुढील विश्लेषणासाठी प्रयोगशाळेत पाठविण्यात आले आहेत. सदर अन्न पदार्थ मिथ्या छापाचे तसेच कमी दर्जाचे असल्याचा संशय असल्याने उर्वरित साठा तातडीने जप्त करण्यात आला. जप्त करण्यात आलेल्या साठ्याची एकूण संख्या ८०,२०८ पेट बाटल्या असून त्याची किंमत ८,०१,६३२ रुपये असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. प्रयोगशाळेच्या अहवालानंतर पुढील कारवाई घेतलेले अन्न नमुने प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार संबंधित आस्थापनेविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाने दिली आहे. अन्न व औषध प्रशासनाची संयुक्त कारवाई ही कारवाई मंगेश माने, सह आयुक्त, सहाय्यक आयुक्त (अन्न) यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. अन्न सुरक्षा अधिकारी आनंद पवार, शशिकांत राणे, अभिजीत जाधव तसेच अन्न व औषध प्रशासनाचे अरविंद राऊत आणि मंगेश भावसार यांनी कारवाईत सहभाग घेतला. अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत संशय निर्माण झाल्यास नमुने तपासणीसाठी घेऊन कायदेशीर प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही प्रशासनाकडून सुरू आहे.

पितृछत्र हरवले, पण जिद्द कायम; चेतन लांडगेची MBBSसाठी निवड!

जन सम्राट टाईम्स

सोयगाव। (प्रतिनिधी): परिस्थिती प्रतिकूल असली, घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असली आणि आयुष्याच्या निर्णायक टप्प्यावर पितृछत्र हरपले तरी जिद्द, मेहनत आणि ध्येयाप्रती प्रामाणिकपणा असेल तर यशाचा मार्ग निश्चितच खुला होतो, हे दत्तवाडी सावरखेडा येथील चेतन दिलीप लांडगे या विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखवले आहे. NEET परीक्षेच्या काळातच वडिलांचे दुःखद निधन झाले. मात्र, या मोठ्या आघातातून सावरत चेतनने आईच्या कष्टांची जाणीव मनात ठेवून अभ्यासाची जिद्द कायम ठेवली आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना येथे MBBS अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला. दुःखावर मात करत ध्येय गाठले चेतनच्या कुटुंबावर NEET परीक्षेच्या काळातच दुःखाचा डोंगर कोसळला. वडिलांचे निधन झाल्याने कुटुंबाचा मोठा आधार हरपला. मात्र, या परिस्थितीने खचून न जाता चेतनने आपल्या वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न उराशी बाळगले. आईने घेतलेल्या कष्टांची जाणीव ठेवत त्याने अभ्यासावर



लक्ष केंद्रित केले. जिद्द, सातत्यपूर्ण मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर त्याने NEETमध्ये यश मिळवून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश मिळवला. ग्रामीण आणि आर्थिकदृष्ट्या सामान्य कुटुंबातील विद्यार्थ्यांसाठी चेतनचे हे यश प्रेरणादायी ठरले आहे.

जि.प. सदस्या पुष्पाताई काळे यांच्याकडून सत्कार चेतनच्या या उल्लेखनीय यशाबद्दल जिल्हा परिषद सदस्या सौ. पुष्पाताई काळे यांनी त्याच्या घरी भेट देऊन शाल व पुष्पगुच्छ देत त्याचा विशेष सत्कार केला. यावेळी त्यांनी चेतनला पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. "भविष्यातही अशीच मेहनत आणि जिद्द कायम ठेवून उत्तम डॉक्टर व्हा आणि गोरगरीब जनतेची सेवा करा," अशा शब्दांत पुष्पाताई काळे यांनी चेतनला शुभेच्छा व आशीर्वाद दिला. यावेळी गावातील महिला, ग्रामस्थ तसेच मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी ठरला प्रेरणादायी आदर्श चेतन लांडगेच्या या यशामुळे दत्तवाडी सावरखेडासह संपूर्ण सोयगाव तालुक्यात त्याचे कौतुक होतमेहनत आणि ध्येयाप्रती प्रामाणिकपणा असेल तर यशाचा मार्ग निश्चितच खुला होतो, हे दत्तवाडी सावरखेडा येथील चेतन दिलीप लांडगे या विद्यार्थ्याने सिद्ध करून दाखवले आहे. NEETकाळातच वडिलांचे दुःखद निधन झाले. मात्र, या मोठ्या आघातातून सावरत चेतनने आईच्या कष्टांची जाणीव मनात ठेवून अभ्यासाची जिद्द कायम ठेवली आणि शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जालना येथे MBBS अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळवला.

विद्यार्थ्यांना मारहाण अन् नोटिसा; महाराष्ट्रात योगी आदित्यनाथ बनण्याचा प्रयत्न करू नका!

जन सम्राट टाईम्स

छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी: महाराष्ट्र पोलिसांची तुलना स्कॉटलंड यार्डच्या पोलिसांशी केली जाते. देशभरात आपल्या कार्यक्षमतेसाठी महाराष्ट्र पोलिसांचे कौतुक केले जाते. मात्र, आंदोलक विद्यार्थी आणि त्यांच्या सहकाऱ्यांना नोटिसा बजावून आंदोलनाचा आवाज दाबण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप अभिजीत दीपके यांनी केला. "गृहमंत्री देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रात योगी आदित्यनाथ बनण्याचा प्रयत्न करत आहेत; मात्र हा महाराष्ट्र आहे, हे त्यांनी विसरू नये," असा घणाघाती निशाणा दीपके यांनी साधला. छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. पोलिसांकडून आंदोलकांवर होत असलेल्या कारवाईवर त्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "सहकाऱ्यांना त्रास देण्यापेक्षा मला थेट अटक करा" चंद्रपूर पोलिसांनी आपल्या सहकाऱ्यांना नोटिसा बजावून आंदोलन हिंसक होण्याची शक्यता असल्याचे नमूद केल्याचा दावा दीपके यांनी केला. "माझ्या सहकाऱ्यांना त्रास देऊन त्यांचा छळ करण्यापेक्षा हिंमत असेल



तर पोलिसांनी मला थेट अटक करावी," असे खुले आव्हान त्यांनी दिले. जंतरमंतरवर आंदोलन करू नका, असा पोलिसांकडून इशारा दिला जात असल्याचे सांगत दीपके यांनी, "जंतरमंतर चंद्रपूरमध्ये येते का?" असा सवाल उपस्थित केला. या कारवाईमागे वरिष्ठ पातळीवरून दबाव असल्याचा आरोपही त्यांनी केला. "आदिवासी विद्यार्थ्यांवर लाठी चालवणे पोलिसांना शोभत नाही" नंदुरबार येथील आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आंदोलन करणारे राहुल पवार आणि इतर विद्यार्थ्यांवर झालेल्या पोलिसांच्या कारवाईचा दीपके यांनी निषेध केला. "राज्यात पोलिसांसमोर गुन्हेगार संपले आहेत का? आदिवासी विद्यार्थ्यांवर लाठ्या चालवण्याची वेळ पोलिसांवर का आली?" असा सवाल त्यांनी केला. तसेच, "हेच एखाद्या उद्योगपतीच्या मुलाबाबत घडले असते, तर पोलिसांनी अशी कारवाई करण्याचे धाडस केले असते का?" असा सवाल उपस्थित करत त्यांनी पोलिसांच्या कारवाईवर टीका केली. "काही झाले तर देशभर जंतरमंतर घडवू" मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणीही दीपके यांनी केली. मतदार याद्यांमधील कथित घोळाचा मुद्दा उपस्थित करत त्यांनी "१३ कोटी मते रद्द करण्यापूर्वी निवडणूक आयोगाने परवानगी घेतली होती का?" असा सवाल केला. राज्यभर दौरे करत असताना विद्यार्थ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रोष असल्याचा दावा त्यांनी केला. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर दडपशाही करण्याचा प्रयत्न झाल्यास त्याला व्यापक स्वरूपात विरोध केला जाईल, असा इशारा देत, "काही झाले तर संपूर्ण देशात 'जंतरमंतर' घडवू," असे दीपके यांनी स्पष्ट केले.

कोळगाव ग्रामपंचायत उपसरपंचपदी सौ. शीतल महाजन बिनविरोध

एकमेव उमेदवारी अर्ज दाखल; मावळत्या उपसरपंच ज्योती महाजन यांनी सोपविला पदभार

जन सम्राट टाईम्स

भडगाव । प्रतिनिधी: भडगाव तालुक्यातील कोळगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ. शीतल कपिल महाजन यांची बिनविरोध निवड करण्यात आली. उपसरपंच पदासाठी शीतल महाजन यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी श्री. जितेंद्र लोणीया यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. निवडीनंतर मावळत्या उपसरपंच सौ. ज्योती महाजन यांनी नवनिर्वाचित उपसरपंच शीतल महाजन यांच्याकडे पदाचा पदभार सुपूर्द केला. यावेळी ग्रामपंचायत पदाधिकारी व सदस्यांनी नवनिर्वाचित उपसरपंचांचे अभिनंदन केले. यावेळी सरपंच सौ. कविता सोनवणे, सौ. ज्योती महाजन, सौ. प्रमिला पाटील, सौ. सुनंदा माळी, सौ. वंदना शिवदास भिल्ल, सौ. सीमा संदेश महाजन, श्री. रूपचंद महाजन, श्री. रोहिदास पाटील, श्री. शुभम ठाकरे आदी ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते. तसेच ग्रामपंचायत सदस्य श्री. विनायक पाटील व श्री. विजय केदार सर यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या. शिक्षण क्षेत्रातूनही अभिनंदन नवनिर्वाचित उपसरपंच शीतल महाजन यांचे पती श्री. कपिल महाजन सर हे किसान शिक्षण संस्थेच्या वडजी येथील विद्यालयात शिक्षक म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्या निवडीबद्दल किसान शिक्षण संस्थेचे चेअरमन श्री.



नानासाहेब प्रताप हरी पाटील तसेच संस्थेच्या सचिव ताईसौ. पूनमताई प्रशांत पाटील यांनी कपिल महाजन सर व नवनिर्वाचित उपसरपंच शीतल महाजन यांचे अभिनंदन केले. ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती निवडीच्या प्रसंगी ग्रामपंचायत कोळगाव नम्रता पॅनलचे प्रमुख श्री. श्याम पाटील सर यांच्यासह श्री. पितांबर पवार, श्री. कौतिक सोनवणे, श्री. गोविंदराव अमराव महाजन, श्री. कपिल महाजन सर, श्री. रविंद्र बोरसे सर (बहाळ), डॉ. अनुप पाटील, श्री. प्रल्हाद रंगराव पाटील, श्री. संदीप हिम्मतराव महाजन, श्री. जिभाऊ मालजी पाटील (पिप्रिहाट), श्री. गोपाल नाना माळी, श्री. दिलीप पाटील सर, श्री. सुभाष मोतीराम पाटील, श्री. बापू सखाराम पाटील, श्री. शिवाजी सोनवणे, श्री. आत्माराम ठाकरे, श्री. प्रदीप महाजन, श्री. भरत पाटील, श्री. सुनील पाटील, श्री. सुभाष जयराम माळी, श्री. देवेंद्र राजेंद्र पाटील, श्री. बापू गोविंदा पाटील, श्री. एकनाथ अभिमान महाजन, श्री. आनंदा महाजन, श्री. प्रमोद महाजन, श्री. चिंधा फकीरा माळी, श्री. राजेंद्र जयराम पाटील, श्री. सावता रामदास महाजन, संदेश महाजन सर, गोविंदा तुकाराम माळी, योगेश सैदाणे, हेमंत महाजन,श्री. रवींद्र दशरथ माळी, श्री. श्याम राजेंद्र माळी, श्री. योगेश साहेबराव महाजन, श्री. दिनेश पाटील, श्री. अंकुश कौतिक सोनवणे, श्री. शिवशंकर महाजन, श्री. पांडुरंग माळी, अनिल बिऱ्हाडे, भीमराव महाजन, प्रवीण महाजन, हेमंत घोडके, श्री. गुलाबराव महाजन, श्री. संजय जाधव, श्री. साहेबराव कोळी, श्री. योगेश महाजन, श्री. समाधान माळी, श्री. रोहित माळी, श्री. जितू गोसावी, श्री. बापू पवार, श्री. दिनेश माळी यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सौ. शीतल महाजन यांचे अभिनंदन करून पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. भडगाव तालुक्यातील कोळगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी सौ. शीतल महाजन यांची निवड करण्यात आली. उपसरपंच पदासाठी शीतल महाजन यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानेनिर्णय अधिकारी श्री. जितेंद्र लोणीया यांनी त्यांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले.

चिनावल मध्ये तरुणाचीस्वतःने गोळी झाडून आत्महत्या !

जन सम्राट टाईम्स

सावदा । प्रतिनिधी: तालुक्यातील चिनावल येथे २७ वर्षीय तरुणाचा संशयास्पद परिस्थितीत मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (६ ऑक्टोबर) मध्यरात्रीच्या सुमारास घडली. या घटनेने चिनावल परिसरात खळबळ उडाली आहे. निर्मल युवराज महाजन (वय २७, रा. चिनावल, ता. रावेर) असे मृत तरुणाचे नाव आहे. घटनेनंतर नातेवाईकांनी त्याला उपचारासाठी सावदा येथील ग्रामीण रुग्णालयात आणले. मात्र, वैद्यकीय तपासणीपूर्वीच त्याचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांच्या निदर्शनास आले. वैद्यकीय तपासीदरम्यान त्याच्या चेहऱ्यावर दुखापत आढळून आली असून, संबंधित दुखापतीमुळे मृत्यू झाल्याचे वैद्यकीय नोंदीत नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी सावदा ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन पाटील यांनी दिलेल्या लेखी



मेमोवरून सावदा पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू रजिस्टर क्रमांक २२/२०२६, BNSS कलम १९४ अन्वये नोंद करण्यात आली आहे. या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश फड यांच्या आदेशानुसार पोलीस उपनिरीक्षक राहुल सानप करीत आहेत. तरुणाच्या मृत्यूमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, पोलिसांकडून विविध बाबींचा तपास सुरू आहे.

‘ओपी शेट’ यांच्या निरपेक्ष कार्याचा सन्मानपत्र देत कृतार्थ गौरव!

मान्यवरांच्या भाषणांतून उलगडला संघर्षशील जीवनपट; अमृतमहोत्सवी सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांची उपस्थिती

जन सम्राट टाईम्स

धुळे । प्रतिनिधी: भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा ज्येष्ठ उद्योजक ओमप्रकाश पुरणमल अग्रवाल यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त सोमवारी (ता. ५) अभीष्टचिंतनासह सन्मानपत्र प्रदानाचा मुख्य कार्यक्रम उत्साहात पार पडला. मुंबई-आग्रा महामार्गावरील टॉपलाइन रिसॉर्ट येथे झालेल्या या रंगतदार सोहळ्यात विविध क्षेत्रांतील मान्यवरांसह धुळेकरांची मोठी उपस्थिती होती. अमृतमहोत्सव समितीतर्फे ओमप्रकाश अग्रवाल यांच्या विविध क्षेत्रांतील कार्याचा गौरव करत त्यांना सन्मानपत्र, शाल व श्रीफळ प्रदान करण्यात आले. यावेळी त्यांच्या जीवनप्रवासावर तयार करण्यात आलेली चित्रफीत प्रदर्शित करण्यात आली. तसेच विविध मान्यवर वक्त्यांनी आपल्या भाषणांतून त्यांच्या संघर्षशील जीवनप्रवासाला उजाळा देत त्यांच्या कार्याची आणि सामाजिक बांधिलकीची माहिती उपस्थितांसमोर मांडली. या कार्यक्रमाला जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल, वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे क्षेत्रीय कार्यवाह बाळासाहेब चौधरी, माजी केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री डॉ. सुभाष भामरे, आमदार अमरिशभाई पटेल, काशिराम पावरा, मंजुळा गावित, राजूमामा भोळे, अमोल जावळे, माजी आमदार कुणाल पाटील, भाजपचे धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, ग्रामीण जिल्हाध्यक्ष बापू खलाणे, जळगावच्या महापौर दीपमाला काळे, धुळ्याच्या महापौर मायादेवी परदेशी, ज्येष्ठ विचारवंत प्रकाश पाठक, ज्येष्ठ उद्योजक विनोद मित्तल, डॉ. महेश घुगरी, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष मनोहर भदाणे, महापालिका आयुक्त नितीन कापडणीस आदी मान्यवर उपस्थित होते. पालकमंत्री जयकुमार रावल, मंत्री संजय सावकारे यांच्यासह अमृतमहोत्सव समितीच्या सदस्यांच्या हस्ते ओमप्रकाश अग्रवाल यांचा सन्मान करण्यात आला. आमदार



अनुपभैयांची विविध संस्थांना देणगी यावेळी प्रास्ताविक करताना आमदार अनुपभैया अग्रवाल म्हणाले की, वडील ओमप्रकाश अग्रवाल यांचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचे भाग्य आपल्याला आणि अमृतमहोत्सव समितीला लाभले. गेल्या ७५ वर्षांपासून धुळेकरांनी अग्रवाल परिवाराला दिलेल्या प्रेमाबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. आपल्याला जनसेवक आमदार म्हणून सेवा करण्याची संधी दिल्याबद्दल धुळेकरांचे आभार मानत त्यांनी आपल्या आमदारपदाच्या वेतनातून ११ लाख रुपयांचा धनादेश दुष्काळी निधीसाठी शासनाला देण्याची घोषणा केली. तसेच डॉ. दुग्गल स्मृती समितीच्या मातोश्री वृद्धाश्रमासाठी दरवर्षी दोन लाख रुपये आणि आदिवासींसह सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी कार्यरत देवगिरी कल्याण आश्रमासाठी एक लाख रुपयांची देणगी देण्याची घोषणाही त्यांनी केली. सर्वसामान्यांचे हित जोपासणारा नेता पालकमंत्री जयकुमार रावल म्हणाले की, सामान्य कुटुंबातून आलेली व्यक्ती जिद्द, कष्ट, संघर्ष आणि निरपेक्ष भावनेतून काम करत असेल तर यश नक्कीच मिळते. ओमप्रकाश अग्रवाल हे त्याचे उदाहरण आहेत. जनसंघ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि भारतीय जनता पक्षाच्या उभारणीसह विविध क्षेत्रांत काम करताना त्यांनी सर्वसामान्यांचे हित डोळ्यासमोर ठेवले. ‘ओपी शेट’ यांनी लावलेल्या रोपट्याचा आज मोठा वटवृक्ष झाला असून, त्याची सावली आणि फळे आज अनेकांना मिळत आहेत, असे गौरवोद्गार रावल यांनी काढले. ओपीजींचे जीवन आदर्शवत वस्त्रोद्योगमंत्री संजय सावकारे म्हणाले की, जीवनात किती पैसा कमावला यापेक्षा आपली मुले कशी घडली, याला अधिक महत्त्व असते. ओमप्रकाश अग्रवाल यांनी दिलेल्या संस्कारांचे प्रतिबिंब त्यांच्या कुटुंबाच्या सामाजिक कार्यातून दिसून येते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुशीतून घडलेल्या ओपी शेट यांनी लहानपणापासून संघर्षाची वाट धरली. सर्वसामान्यांच्या कल्याणाची कास धरल्यामुळेच त्यांच्या कुटुंबातील पुढील पिढीलाही सामाजिक आणि सार्वजनिक जीवनात कार्य करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या जीवनप्रवासातून आजच्या तरुण पिढीला प्रेरणा घेता येईल, असे सावकारे यांनी सांगितले. संघर्षातून साधला उत्कर्ष आमदार अमरिशभाई पटेल यांनी ओमप्रकाश अग्रवाल यांच्या कुटुंबाशी असलेल्या जुन्या संबंधांना उजाळा दिला. ओमप्रकाश अग्रवाल यांच्या पत्नी तथा अनुपभैयांच्या मातोश्री (कै.) विमलादेवी यांचे माहेर शिरपूरचे असल्याचे सांगत पटेल यांनी अग्रवाल परिवाराशी असलेल्या कौटुंबिक संबंधांच्या आठवणी सांगितल्या. ओपी शेट यांनी जीवनाच्या सुरुवातीच्या काळात केलेला संघर्ष आणि त्यातून साधलेला उत्कर्ष, तसेच त्यांनी दिलेले संस्कार यामुळेच अनुपभैया घडले. आता समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचून त्याला न्याय देण्याची जबाबदारी अनुपभैयांवर आहे. त्यासाठी ओपी शेट यांनी दिलेले विचार आणि संस्कारांची कास धरून कार्यरत राहावे.

ओपीजींचे जीवन प्रत्येकासाठी अनुकरणीय

ज्येष्ठ विचारवंत प्रा. प्रकाश पाठक म्हणाले की, ओमप्रकाशजींचे वडील पुरणमलजी राजस्थानातून धुळ्यात आल्यानंतर जनसंघ आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम निष्ठेने करत होते. वडिलांच्या संस्कारांमुळेच ओपी शेट संघाशी एकरूप झाले. दुर्लक्ष, टिंगल, टीका, समजून घेण्याची भूमिका आणि त्यानंतर गौरव किंवा कौतुकाचा टप्पा, असा जीवनप्रवासातील अमृतमहोत्सवाचा टप्पा असतो. ओपी शेट यांचाही जीवनप्रवास या टप्प्यांतून घडला आहे. भूतकाळातून शिकत वर्तमानातून विकास साधण्याची दृष्टी त्यांनी कायम ठेवली. कष्टाची जाणीव ठेवत त्यांनी सातत्याने माणसे जोडण्याचे काम केले. संघ आणि भाजपमध्ये काम करताना अनेक पदे भूषवूनही ते कायम कार्यकर्त्याच्या भूमिकेत राहिले. निरपेक्षपणे जगताना त्यांनी यशाचे श्रेय स्वतःपुरते न ठेवता सर्वांचे मानले. “आनंदात हुरळायचे नाही, दुःखात नाउमेद व्हायचे नाही, कष्टात चिंता करायची नाही आणि संघर्षात थांबायचे नाही,” या जीवनमूल्यांचा आदर्श ओमप्रकाश अग्रवाल यांनी घालून दिला आहे. सर्वांना सोबत घेऊन मानवी साखळी निर्माण करणारे त्यांचे जीवन प्रत्येकासाठी अनुकरणीय आहे. पुढील पिढीवरही हाच संस्कार व्हावा, अशी अपेक्षा प्रा. पाठक यांनी व्यक्त केली.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

‘सुंदर माझी शाळा’ उपक्रमात सत्रासेन आश्रमशाळा जिल्ह्यात प्रथम



जन सम्राट टाईम्स

चोपडा। प्रतिनिधी : महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभाग, नाशिक अंतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, यावल यांच्या वतीने सन २०२५-२६ मध्ये राबविण्यात आलेल्या ‘सुंदर माझी शाळा व वसतिगृह’ उपक्रमात धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित धनाजी नाना प्राथमिक व डी.आर.बी. माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, सत्रासेनने अनुदानित आश्रमशाळा गटातून जळगाव जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय यश संपादन केले. या दैदिप्यमान कामगिरीबद्दल शाळेला सन्मानचिन्ह आणि रोख एक लाख रुपयांचे पारितोषिक प्रदान करण्यात आले. बक्षीस वितरण सोहळ्यात उपआयुक्त श्री. हिवाळे, प्रकल्प अधिकारी श्री. अरुण पवार, उपजिल्हाधिकारी श्री. श्रीमंत हरकर, सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्री. प्रशांत माहुरे, श्री. संदीप पाटील, श्री. प्रदीप दाभाडे, श्री. पवन पाटील तसेच सहाय्यक प्रकल्प अधिकारी श्रीमती मिनाक्षी सुलताने आदींच्या उपस्थितीत शाळेचा गौरव करण्यात आला. स्वच्छता, पर्यावरण संवर्धनाला प्राधान्य शाळेची स्वच्छता, पर्यावरण संवर्धन, विद्यार्थ्यांसाठी सुरक्षित व आनंददायी शैक्षणिक वातावरण, शिस्तबद्ध नियोजन तसेच विविध शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी यामुळे शाळेने जिल्हास्तरीय प्रथम क्रमांक मिळविला. या यशामुळे शिक्षणमहर्षी संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय आप्पासाहेब रायसिंग फुगा भादले यांनी पाहिलेले शैक्षणिक विकासाचे स्वप्न साकार होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. त्यांच्या शैक्षणिक विचारांना आणि दूरदृष्टीला ही यशस्वी वाटचाल खरी आदरांजली ठरली आहे. सामूहिक प्रयत्नांना यशाची पावती शाळेच्या या यशात प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक, सर्व शिक्षक-शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांचे योगदान महत्त्वाचे ठरले. एकजूट, सातत्यपूर्ण मेहनत, नियोजन आणि समर्पित कार्याच्या जोरावर शाळेने हा बहुमान मिळविल्याचे संस्थेच्या वतीने सांगण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष रविंद्र रायसिंग भादले, उपाध्यक्ष धनंजय रायसिंग भादले, सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले, संचालक जितेंद्र रायसिंग भादले, नरेंद्र रायसिंग भादले, परमवीर रायसिंग भादले व चैतन्य भादले तसेच सत्रासेन गावाच्या लोकनियुक्त सरपंच वंदना ज्ञानेश्वर भादले यांनी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. जिल्ह्यातील अनुदानित आश्रमशाळा गटातून प्रथम क्रमांक मिळवत सत्रासेन आश्रमशाळेने आपल्या शैक्षणिक वाटचालीत आणखी एक मानाचा टप्पा गाठला असून, या यशामुळे शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

उजनी मच्छिमार बचाव अभियानाला मोठे यश; मासेमारीची ईओआय प्रक्रिया अखेर रद्द!

जन सम्राट टाईम्स

भिगवण । प्रतिनिधी : उजनी जलाशयातील मासेमारी व्यवसाय ठेकेदारी पद्धतीने देण्याच्या संभाव्य प्रक्रियेला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. पारंपरिक मच्छिमारांच्या रोजगारावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करत उजनी मच्छिमार बचाव अभियानाच्या वतीने सुरू असलेल्या सातत्यपूर्ण आंदोलनाची शासनाने दखल घेतली असून, उजनी जलाशयातील मासेमारीसाठी सुरू करण्यात आलेली ईओआय (स्वारस्य अभिव्यक्ती) प्रक्रिया रद्द करण्याची घोषणा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सोमवारी (दि. ५) मंत्रालयात केली. यावेळी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे उपस्थित होते, तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे बैठकीत सहभाग घेतला. ठेकेदारीच्या निर्णयाविरोधात दोन-अडीच महिने आंदोलन उजनी जलाशयातील मासेमारी व त्यावर आधारित व्यवसायासाठी कृष्णा खोरे विकास महामंडळाकडून ईओआय प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. त्यामुळे पारंपरिक पद्धतीने मासेमारी करणाऱ्या मच्छिमारांचा व्यवसाय भांडवलदार कंपन्यांच्या हातात जाण्याची भीती मच्छिमार संघटनांनी व्यक्त केली होती. या निर्णयाच्या विरोधात गेल्या दोन ते अडीच महिन्यांपासून उजनी जलाशयाच्या काठावरील विविध गावांमध्ये आंदोलनाची मालिका सुरू होती. गावोगावी एकदिवसीय लाक्षणिक उपोषणे, पुण्यातील प्राणांतिक उपोषण तसेच कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमोर संतप्त आंदोलकांकडून बांगड्या फोडण्याचे आंदोलन करण्यात आले. भिगवण व इंदापूर येथील मासळी बाजार बंद ठेवूनही आंदोलनाला पाठिंबा देण्यात आला होता. हजारो कुटुंबांच्या रोजगाराचा प्रश्न उजनी जलाशयातील मासेमारी व्यवसायावर पारंपरिक मच्छिमारांसह भूमिहीन, पारधी, मागासवर्गीय आणि मुस्लिम कुटुंबांचा रोजगार व उदरनिर्वाह अवलंबून असल्याचे मच्छिमार संघटनांचे म्हणणे आहे. मासेमारी व्यवसाय ठेकेदारी पद्धतीने दिल्यास केवळ मच्छिमारच नव्हे, तर मासळी व्यापारी, आडतदार, हॉटेल व्यावसायिक, जाळी विक्रेते, बर्फ कारखानदार तसेच संबंधित कामगारांच्या व्यवसायावरही परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली होती. मंत्रालयातील बैठकीत निर्णय मच्छिमार प्रतिनिधींसोबत मंत्रालयात झालेल्या बैठकीत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी ईओआय प्रक्रिया रद्द करण्याची घोषणा केली. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनीही या प्रश्नावर पाठपुरावा केला, तर माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी निर्णयाला पाठिंबा दर्शविला. शासनाच्या निर्णयाची घोषणा होताच उजनी परिसरातील मच्छिमारांनी आनंद व्यक्त केला. सातत्यपूर्ण आंदोलन, बाजार बंद आणि विविध लोकशाही मार्गांचा अवलंब करून केलेल्या संघर्षाला अखेर यश मिळाल्याची भावना मच्छिमारांनी व्यक्त केली. आंदोलनात मच्छिमारांचा सक्रिय सहभाग उजनी मच्छिमार बचाव अभियानाच्या वतीने चंद्रकांत भोई, दत्तात्रय व्यवहारे, उज्वला परदेशी, बाळासाहेब काळे, संजय दरदरे, बाळासाहेब गाडेकर, अनिल नगरे, बापुराव भोई, विक्रम शेलार, अनिता नगरे, युवराज नगरे, बलभीम भोई, अमोल पतुरे, पोपट नगरे, भारत भोई, लतीफ काळे, अमजद शेख आदींच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले.

एरंडोलमध्ये ज्येष्ठ नागरिकांसाठी विधी सेवा शिबिर उत्साहात

ज्येष्ठ नागरिकांचे कायदेशीर हक्क व अधिकारांबाबत मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

एरंडोल । (प्रतिनिधी): तालुका विधी सेवा समिती आणि तालुका वकील संघ, एरंडोल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दत्त कॉलनी, एरंडोल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात विधी सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्क, अधिकार आणि उपलब्ध विधी सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी एरंडोल न्यायालयाचे न्यायाधीश कुर्हाडे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी निकम साहेब होते. यावेळी गुरव साहेब, भालेराव सर यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कायदेशीर हक्कांबाबत मार्गदर्शन एरंडोल येथील रिटेनर ॲड. मधुकर बी. देशमुख, ॲड. प्रतिभा पाटील, ॲड. जयेश पिलोरे, तसेच पीएलव्ही मा. अग्रवाल सर, पंढरीनाथ मोरे, हर्षदा पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्क व अधिकारांबाबत मार्गदर्शन केले.



ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या विविध कायदेशीर अडचणींबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे, तसेच उपलब्ध विधी सेवा आणि कायदेशीर मदतीची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचावी, या उद्देशाने शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ज्येष्ठ नागरिकांचा मोठा सहभाग यावेळी ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष अरुण माळी सर यांच्यासह संघाचे पदाधिकारी, सदस्य तसेच ॲड. जे. जी. पाटील सर उपस्थित होते. शिबिरास एरंडोल शहरातील ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक ॲड. मधुकर बी. देशमुख यांनी केले. ज्येष्ठ नागरिकांच्या कायदेशीर हक्कांविषयी जागृती निर्माण करणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी स्वागत केले. तालुका विधी सेवा समिती आणि तालुका वकील संघ, एरंडोल यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त दत्त कॉलनी, एरंडोल येथील ज्येष्ठ नागरिक सभागृहात विधी सेवा शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या कायदेशीर हक्क, अधिकार आणि उपलब्ध विधी सेवांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमासाठी एरंडोल न्यायालयाचे न्यायाधीश कुर्हाडे साहेब प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शिबिराच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी निकम साहेब होते. यावेळी गुरव साहेब, भालेराव सर यांच्यासह विधी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते

धरणगाव तालुक्यात दुष्काळग्रस्त शेती पिकांचे पंचनामे सुरू

जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: यंदा पावसाने ओढ दिल्याने धरणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटल्याने तसेच उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नुकसानग्रस्त शेती पिकांचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. धरणगाव तालुक्यातील भवरखेडे गावासह परिसरातील विविध गावांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी करीत आहेत. पावसाचे प्रमाण, पिकांची सद्यस्थिती, पिकांची वाढ आणि पावसाअभावी झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून त्याची नोंद घेत पंचनामे करण्यात येत आहेत. पावसाअभावी पिकांचे नुकसान भवरखेडे परिसरातील शेतकऱ्यांनी पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगितले. पावसाने वेळेवर साथ न दिल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून, उत्पादनात घट होण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांनी पंचनाम्याची प्रक्रिया



पारदर्शक आणि तातडीने पूर्ण करून पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या नियमानुसार मदत मिळावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. अचूक पंचनाम्यांकडे शेतकऱ्यांचे लक्ष तालुक्यातील नुकसानग्रस्त क्षेत्राची प्रत्यक्ष पाहणी करून पंचनामे पूर्ण करण्याचे काम सुरू आहे. प्रशासनाकडून करण्यात येणाऱ्या नोंदींच्या आधारे पुढील मदतीची कार्यवाही होणार असल्याने पंचनामे अचूकपणे होणे महत्त्वाचे ठरणार आहे. पावसाअभावी आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून वेळेत मदत मिळावी, यासाठी पंचनाम्याची प्रक्रिया लवकर पूर्ण करण्याची मागणी होत आहे. यंदा पावसाने ओढ दिल्याने धरणगाव तालुक्यातील अनेक गावांमध्ये खरीप हंगामातील पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटल्याने तसेच उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता निर्माण झाल्याच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नुकसानग्रस्त शेती पिकांचे पंचनामे करण्यास सुरुवात केली आहे. धरणगाव तालुक्यातील भवरखेडे गावासह परिसरातील विविध गावांमध्ये संबंधित अधिकारी व कर्मचारी प्रत्यक्ष शेतशिवारात जाऊन पिकांची पाहणी करीत आहेत. पावसाचे प्रमाण, पिकांची सद्यस्थिती, पिकांची वाढ आणि पावसाअभावी झालेल्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करून त्याची नोंद घेत पंचनामे करण्यात येत आहेत. पावसाअभावी पिकांचे नुकसान भवरखेडे परिसरातील शेतकऱ्यांनी पावसाअभावी खरीप पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे सांगितले. पावसाने वेळेवर साथ न दिल्याने पिकांच्या वाढीवर परिणाम झाला असून, उत्पादनात घट होण्याची चिंता शेतकऱ्यांमध्ये आहे.

हरीभाऊ जावळे यांच्या शैक्षणिक कार्याला विद्यार्थ्यांच्या लेखणीतून अभिवादन!

भालोद महाविद्यालयात निबंध स्पर्धा; २८ विद्यार्थ्यांचा सहभाग, निबंधांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस

जन सम्राट टाईम्स

भुसावळ । प्रतिनिधी: स्वर्गीय खासदार हरीभाऊ जावळे यांच्या जयंतीनिमित्त कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद येथील राज्यशास्त्र विभागाच्या वतीने शनिवार, दि. ३ ऑक्टोबर २०२६ रोजी निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत महाविद्यालयातील २८ विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत विविध विषयांवर निबंध सादर केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी सहज उपलब्ध व्हावी आणि परिसरातील मुला-मुलींना शिक्षणासाठी दूर जावे लागू नये, या दूरदृष्टीतून स्वर्गीय खासदार हरीभाऊ जावळे यांनी भालोद येथे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. त्यांच्या शैक्षणिक कार्याचे स्मरण तसेच त्यांच्या विचारांची आणि कार्याची ओळख नव्या पिढीला व्हावी, या उद्देशाने ही स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांसाठी विविध विषय स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना ‘ग्रामीण भागातील उच्च शिक्षणाची ज्ञानगंगा’, ‘स्वर्गीय हरीभाऊ जावळे यांचे शैक्षणिक योगदान’, ‘भालोदच्या शैक्षणिक परिवर्तनाचे शिल्पकार’, ‘एका महाविद्यालयाची निर्मिती आणि हजारो स्वप्नांना मिळालेले पंख’, ‘शिक्षणातून ग्रामविकास’, ‘ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची संधी’, ‘मुलींच्या उच्च शिक्षणासाठी भालोद महाविद्यालयाचे योगदान’, ‘लोकप्रतिनिधी आणि शिक्षणविकास’, ‘एका दूरदृष्टीच्या लोकनेत्याचे शैक्षणिक स्वप्न’,



‘शिक्षणाची संधी ते आत्मनिर्भरता’, ‘हरीभाऊ जावळे यांचे शैक्षणिक कार्य : प्रेरणा, विचार आणि वारसा’, ‘उच्च शिक्षणाचे विकेंद्रीकरण आणि ग्रामीण समाजाचा विकास’ यांसह विविध विषय देण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या विषयांची निवड करून त्यावर अभ्यासपूर्ण निबंध लेखन केले. २८ वर्षांचा शैक्षणिक वारसा कला व विज्ञान महाविद्यालय, भालोदच्या स्थापनेला आता २८ वर्षे पूर्ण झाली आहेत. या कालावधीत महाविद्यालयातून शिक्षण घेतलेल्या अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक, वकील, शासकीय अधिकारी तसेच खासगी क्षेत्रातील विविध पदांवर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांच्या यशामध्ये महाविद्यालयाचे योगदान राहिले आहे. या शैक्षणिक प्रवासाचा आणि हरीभाऊ जावळे यांच्या योगदानाचा मागोवा विद्यार्थ्यांच्या लेखणीतून घेण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. निबंधांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व २८ विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. तसेच प्रथम क्रमांकासाठी ₹५०१, द्वितीय क्रमांकासाठी ₹२५१, तृतीय क्रमांकासाठी ₹१५१ आणि पाच उत्तेजनार्थ पारितोषिके देण्यात येणार आहेत.

या स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या निबंधांचे संकलन करून स्वतंत्र पुस्तक प्रकाशित करण्याचा मानस राज्यशास्त्र विभागाने व्यक्त केला आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लेखन केवळ स्पर्धेपुरते मर्यादित न राहता स्वर्गीय हरीभाऊ जावळे यांच्या शैक्षणिक कार्याचा दस्तऐवज म्हणून जतन होण्यास मदत होणार आहे.

अभिजात मराठीचा जागर; ग्रंथ प्रदर्शनातून वाचनसंस्कृतीला बळ



जन सम्राट टाईम्स

धरणगाव । प्रतिनिधी: अभिजात मराठी भाषा दिन व सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, मराठी साहित्याची ओळख व्हावी आणि समृद्ध वाचनसंस्कृती रुजावी, या उद्देशाने इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, धरणगाव येथे ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. या प्रदर्शनाचे उद्घाटन धरणगावच्या गटशिक्षणाधिकारी डॉ. भावना भोसले यांच्या हस्ते उत्साहात करण्यात आले. यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी राजेंद्र सैंदाने, केंद्रप्रमुख डॉ. भिकन शिरसाट, प्रदीप जाधव, मनोहर नेरकर, सुनील पाटील तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक जे. के. पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या प्राचार्या सुरेखा पाटील होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून आदर्श विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीपकुमार सोनवणे, माजी पर्यवेक्षक राजेंद्र पडोळ, उपमुख्याध्यापक ए. एस. पाटील आणि पर्यवेक्षिका भारती पाटील उपस्थित होते.